# ‘सुखकर’ हो !

- अमोल पालेकर

मराठी रंगभूमीच्या दीडशे वर्षांच्या वाटचालीचं अवलोकन करण्याचे आजवरचे प्रयत्न बघितले तर असं जाणवतं की बहुतांशी लेखन रंगभूमीच्या (व्यावसायिक म्हणवल्या जाणा-या) धंदेवाईक रूपापुरतंच मर्यादित आहे. वेगवेगळ्या कालखंडातल्या मराठी नाटकांचा ताळेबंद मांडताना, आधी साहित्यिक मानदंडांच्या पट्ट्या लावल्या गेल्या आणि नंतर प्रामुख्याने नाटकांच्या आर्थिक यशापयशाच्या मोजमापांच्या आधाराने त्यांची गुणवत्ता नोंदवली गेली. वलयांकित अभिनेते, नाटककार, दिग्दर्शक यांच्या कलाक्षमतेची नोंदसुध्दा बहुतेकवेळा बॉक्सऑफिसच्या आकडेवारीवर आधारित असल्याचं दिसतं. बालरंगभूमी, कामगार रंगभूमी, दलित रंगभूमी या सारख्या रूपांची तर जवळजवळ उपेक्षाच झाल्याचं दिसतं. अर्थात, रंगभूमीच्या ऐतिहासिक वाटचालीची नोंद अशा एकांगी दृष्टीकोनातून केली गेली असली तरी गौण मानण्याची गरज नाही. पण धंदेवाईक रूपापलीकडे जाऊन अस्तित्वात असलेल्या आणि अत्यंत महत्वाचं योगदान असलेल्या (सर्वसाधारणपणे प्रायोगिक म्हणवल्या जाणा-या) समांतर रंगभूमीबद्दल कमी लिहीलं गेलं, याची खंत नक्कीच वाटते.

मराठी रंगभूमीच्या अशा दुर्लक्षित रूपांचा एक अतिशय उत्कट प्रत्यय कमलाकर नाडकर्णीच्या संग्रहित लेखांतून साकारलेल्या ‘नाटकी नाटक’ या पुस्तकातून मिळतो. शिवाय, या प्रमुख रूपांपलीकडे डोकावल्यावर कालच्या कालखंडातली महाविद्यालयीन रंगभूमी, राज्यनाट्यस्पर्धा आणि इतर नाट्यस्पर्धा, समीप नाट्य, शारीर नाट्य, परिसर नाट्य, मुक्तमंच यांसारख्या अनेक मोहक रूपांचा इतिहासही कमलाकरच्या नितळ समीक्षेतून रंजक पध्दतीने उलगडत जातो. त्याच्या शब्दातलं ‘ते १९६0च्या दशकातलं मुंबईतलं नाट्यवातावरण’ ज्या सहजपणे डोळयांसमोर उभं राहतं ते रंगभूमीची नव्याने ओळख होणा-या आजच्या तरूणाईला नक्कीच अचंबित करून टाकेल; त्याच वेळेला, त्या मंतरलेल्या काळाचा साक्षीदार असलेल्या माझ्यासारख्याच्यासुध्दा डोळ्यांच्या कडा नकळत ओलावून जातात, हेही तितकंच खरं !

“एका बाजूला आम्ही ‘एकच प्याला’, ‘शारदा’, ‘संशयकल्लोळ’, ‘हॅम्लेट’, ‘झुंजारराव’ ही नामवंत कलावंतांनी सादर केलेली नाटकं बघत होतो. साहित्यसंघाच्या खुल्या नाट्यगृहात घुसत होतो. तेजपाल हॉलला सत्यदेव दुबे, अमरीश पुरी यांची हिंदी नाटकंही बघत होतो. आत्माराम भेंडेंच्या ‘क्रॅप्स लास्ट टेप’च्या गिरगावच्या शाळेतल्या वर्गात झालेल्या प्रयोगाला आमची हजेरी होती. नुकत्याच स्थापन झालेल्या ‘रंगायन’ची नाटकंही बघत होतो. भुलाभाई इन्स्टिट्यूटच्या गच्चीवरचं नाटक

आम्ही चुकवत नव्हतो आणि ऑपेरा हाऊसला, तिसऱ्या मजल्यावरच्या गॅलरीत थिएटरच्या खुर्चीत असलेला हातपंखा घेऊन पृथ्वीराज कपूर यांची 'दीवार', 'पठाण' ही नाटकंही बघत होतो." ह्या अशा अनेकांगाने प्रशस्त कालखंडाचे कित्येक छोटेमोठे पदर कमलाकरने अत्यंत मार्मिकपणे उलगडून दाखवले आहेत.

"सगळ्या प्रकारची नाटकं बघत आणि त्यातली गुणवत्ता वेचत असल्यामुळे कुठच्या एकाच पक्षाचे पाठीराखे न होता" नाटकावर अमाप प्रेम करण्याचं शिवधनुष्य त्याने लीलया पेललं आहे. त्यामुळेच कदाचित, तात्यासाहेब शिरवाडकरांनी समीक्षक दृष्टीने घेतलेल्या शेक्सपिअरच्या शोधात तो निरागसपणे रंगून जातो; अभिराम भडकमकरच्या 'बालगंधर्व' कादंबरीचं विश्लेषणात्मक, मनमोकळं कौतुक करतो आणि त्याच विषयावरच्या अत्यंत नावाजलेल्या चित्रपटावर "विकलांग होत जाणारी कलाकृती" अशी खरमरीत टीकाही करतो; अण्णासाहेब किर्लोस्करांच्या १८७५ ते १८८४ या कालखंडात लिहीलेल्या नाट्यसंहितांमधली 'प्रायोगिकता' विशद करताना तो जसा हरखून जातो तसाच, पुरूषोत्तम दारव्हेकरांच्या यशस्वी नाट्यलेखनातले यरंगभूमीने कसं चैतन्य दिलं, ह्या आठवणी जाग्या करताना काही अत्यंत महत्वाच्या घडामोडींवर भाष्यही करतो. उदाहरणार्थ १९४८ साली, महाराष्ट्र सरकारने तमाशावर बंदी आणल्यानंतर, अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख प्रभृतींनी 'तमाशाऐवजी लोकनाट्य सादर करण्याचं' जाहीर करून सरकारी आदेश कसे धुडकावून लावले आणि व्यक्तीस्वातंत्र्याच्या लढ्याला एक परिणामकारक पदर कसा बहाल केला, ह्याबद्दलही कमलाकर असोशीने लिहीतो आणि छबिलदासच्या संपूर्ण अवकाशाचा मुक्तपणे वापर करून प्रायोगिक रंगभूमीला तीन नाटकांनी दिलेलं योगदान अचूक नोंदवण्याचं महत्वाचं कामही बजावतो. तसंच, सुधा करमरकरांनी जिद्दीने उभी केलेली बालरंगभूमीची चळवळ सुलभा देशपांडे आणि रत्नाकर मतकरीपासून कांचन सोनटक्के आणि रामनाथ थरवळ सारख्यांनी कशी जागृत ठेवली, याचं यथायोग्य मोजमाप करताना कमलाकरचा हात आखडत नाही; गुर्जर रंगभूमीवरचा उपेक्षित, प्रायोगिक नाटककार मधु राय याच्या नाट्याविष्कारांची आठवण तो आवर्जून करून देतो आणि अमराठी नाटककारांनी मराठी रंगभूमीला दिलेल्या नवचैतन्याचा आढावाही घेतो.

अलीबाबाच्या अंधाऱ्या गुहेत पाऊल टाकावं आणि एकामागून एक प्रशस्त दालनं उजळून दृष्टीपथात यावीत असा काहीसा पुनःप्रत्ययाचा आनंद ह्या लिखाणातून मिळत जातो. पण कमलाकर ह्या दालनांच्या स्मरणरंजनात गुंतून राहत नाही. त्याच वेळेला त्याची भिरभिरती नजर वळचणीचा एखादा छोटासा कोनाडा धुंडाळते आणि स्पॉटलाईट सरकतो तो नानू संझगिरी, रामचंद्र वर्दे, ग.के.दातार यांच्या सारख्या विस्मरणात गेलेल्या नाट्यकर्मींच्या योगदानावर!

कमलाकरच्या उदंड नाट्यप्रेमाचे हे तरंग मराठी रंगभूमीच्या वाटचालीच्या एकूण स्वरूपाला डोळस सौष्ठव बहाल करतात. त्यामुळे 'नाटक बिटक' प्रांतात विहार

करणाऱ्या सगळ्याच नाट्यवेड्यांसाठी हा प्रवास ‘सुखकर’ ठरेल, यात शंका नाही . . . आणि असा आगळावेगळा नाट्यरूपानुभव दिल्याबद्दल कमलाकरला standing ovation देणं नक्कीच उचित ठरेल !